शिरूर नगरपरिषद
स्थापना : १८६८
शिरूर, जि. पुणे
महाराष्ट्र

शिरूर नगरपरिषद, घोडनदी
शिरूर, जि. पुणे. ४१२ २१०

**सौ. ऐश्वर्या अभिजित पाचर्णे**
नगराध्यक्षा
☎ कार्यालय - (०२१३८) २२२२६२
मो. नं. ९९८८२३५५५५

जा. क्र.                                                                                   दिनांक : 15 / 07 /२०२6

प्रति,

मा.ना.कु. आदितीताई सुनिल तटकरे,
मंत्री, महिला व बाल विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

**विषय:- शिरूर शहरातील महिलांची कर्जाच्या नावाखाली झालेल्या आर्थिक फसवणुकीची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करणेबाबत....**

शिरूर शहरातील काही महिलांची कर्ज मिळवून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक झाल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर प्रकरणामध्ये शिरूर शहरातील काही महिलांचा सहभाग असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, मी शिरूर शहराची प्रथम नागरिक या नात्याने सदर प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करणेकामी व फसवणूक झालेल्या महिलांच्या तक्रारी व म्हणणे नोंदवून घेऊन त्यांना योग्य न्याय मिळवून देणेकामी तसेच चौकशीअंती दोषी आढळणाऱ्या संबंधित व्यक्तींविरुद्ध प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार कठोर कारवाई करणेकामी मा.पोलिस निरीक्षक,शिरूर शहर पोलिस स्टेशन यांना निवेदन दिलेले आहे.

तरी, सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता तातडीने चौकशी करणेकामी आपले स्तरावरून संबंधितांना निर्देश देण्यात यावे, ही विनंती.

आपली विश्वासू,

(ऐश्वर्या अभिजित पाचर्णे)
नगराध्यक्षा,
शिरूर नगरपरिषद,घोडनदी

15/7/26
लिपिक
मंत्री
महिला व बालविकास
यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२